# विद्युत लोकपाल (मुंबई)

(विद्युत अधिनियम २००३ च्या कलम ४२(६) अंतर्गत)

अभिवेदन (Representation) क्रमांक ५० / २०२२

## जास्तीचे वीज देयकाबाबत

इस्माईल हमीद शेख ........ ........................................................................................ अपिलार्थी

विरूध्द

महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनी, उल्हासनगर - २ (महावितरण) ................................ प्रतिवादी

उपस्थिती :-

अपिलार्थीतर्फे :- इस्माईल हमीद शेख
शंकर वर्मा, ग्राहक प्रतिनिधी

प्रतिवादीतर्फे :- विजय दिनकर यादव, अतिरीक्त कार्यकारी अभियंता

कोरम :- वन्दना कृष्णा (निवृत्त भा.प्र.से.)

सुनावणी तारीख :- ५ जुल २०२२

आदेश पारित दिनांक :- १९ जुल २०२२

## आदेश

महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (ग्राहक गाऱ्हाणे निवारण मंच व विद्युत लोकपाल) विनियम २०२० (ग्राहक गाऱ्हाणे विनियम २०२०) मधील विनियम १९.१ अन्वये ग्राहक गाऱ्हाणे निवारण मंच, महावितरण, कल्याण परिमंडळ, (मंच) यांच्या दिनांक १८ फेबवारी २०२२ च्या आदेशाविरूध्द उपरोक्त अपिलार्थीने सदरचे अभिवेदन दिनांक १२ एप्रिल २०२२ रोजी दाखल केले.

(Dilip Dumbre)
Secretary
Electricity Ombudsman Mumbai

Electricity Ombudsman Mumbai M.E.R.C.

२.	मंचाने तक्रारदार यांचा मंचाकडे दिनांक १६ डिसेंबर २०२१ रोजीचा अर्ज क्रमांक K/E/1834/2279 of 2021-22 बाबत दिनांक १८ फेबवारो २०२२ रोजीच्या आदेशान्वये मंचाने मान्य करताना वितरण परवानाधारकास डिसेंबर २०१८ ते नोव्हेंबर २०१९ या कालावधीसाठी ग्राहकाने भरणा केलेली जास्तीची रक्कमेचा बँक दरानूसार व्याजासह परतावा करावा असे आदेशीत केले.

३.	अपिलार्थीने त्यांच्या निवेदनातोल व दिनांक ५ जुल २०२२ रोजीच्या सुनावणीदरम्यान सादर केलेले प्रमुख मुद्दे खालील प्रमाणे आहेत.

- अपिलार्थीने नमुद केले की, जून २०१७ पासून अपिलार्थी हे त्यांच्या घरात राहत नव्हते. त्यावेळी मीटरवर चालू रिडींग ०२३९९ दिसत होत. अपिलार्थी वस्तूतः तेथे राहत नसताना ही ऑक्टोबर २०१७ त नोव्हेबर २०१८ या कालावधीत फॉल्टी स्टेटस प्रमाणे १७० युनीट प्रतीमहा वापराची चुकीची वीज देयके दिली. डिसेंबर २०१८ मध्ये २०१०२१८५ या क्रमांकाचे नवीन मीटर बसविण्यात आले, त्यावर ५४१८ इतके सुरवातीचे रिडींग होते. खरेतर, प्रतिवादींनी नवीन मीटर बसविणे क्रमप्राप्त होते, परंतू त्यांनी तसे केले नाही. ऑक्टोबर २०१७ ते नोव्हेबर २०१८ या कालावधीतील वीज देयके दुरूस्त करून देण्यात यावी.
- अपिलार्थीना डिसेंबर २०१८ ते नोव्हेंबर २०१९ या कालावधीत वीज वापराची देयके वाणिज्य दराने आकारण्यात आलो, तो घरगुती दराप्रमाणे आकारणी करून देण्यात यावो.
- अपिलार्थीस जून २०१९ ते जून २०20 या कालावधीत फॉल्टी स्टेटस प्रमाणे वीज देयके देण्यात आली. अपिलार्थीचा वीज वापर खुप कमी आहे. सबब, ह्या कालावधीची वीज देयके रद्द करण्यात यावी.
- अपिलार्थींनी अशी मागणी केली की, ऑक्टोबर २०१७ ते जून २०20 या कालावधीतोल जास्तीची भरणा केलेली वीज देयके रोखीने परत देण्यात यावी, रू.१0000/- ची नुकसान भरपाई देण्यात यावी व दोषी अधिकाऱ्यांवर कारवाई करण्यात यावी.

४.	प्रतिवादी महावितरणने अपिलार्थीने त्यांच्या दिनांक २४ जून २०२२ च्या उत्तरात नमुद केलेले व दिनांक ५ जुल २०२२ रोजीच्या सुनावणीदरम्यान सादर केलेले प्रमुख मुद्दे खालील प्रमाणेः

(Dilip Dumbre)
Secretary
Electricity Ombudsman Mumbai

- ग्राहक क्र.०२१५१४८९५१८७ इस्माइल हमीद शेख (अपिलार्थी) यांच्या नावे असून सदर वीज जोडणी करीता सद्यस्थितीत जिनिअस कंपनीच - ०९६१९३०६ क्रमांकांचे सिंगल फेज मीटर बसविण्यात आलेले आहे. ग्राहकांचा सर्व कालावधीसाठी सरासरी वीज वापर १५० ते २०० युनीट प्रतिमहा आहे.

- **<u>वीज देयक दुरूस्ती भाग १:</u>** (डिसेंबर २०१७ ते नोव्हेंबर २०१८)

  अपिलार्थीस डिसेंबर २०१७ ते नोव्हेंबर २०१८ पर्यत मीटर फॉल्टी असल्यामुळे फॉल्टी स्टेटस चे वीज देयके देण्यात आली होती. परंतू जानेवारी २०१८ ते नोव्हेंबर २०१८ पर्यतची वीज देयके नवीन मीटरच्या वीज वापराप्रमाणे म्हणजे १९० युनीट प्रमाणे Bill Revision ID 9938710 द्वारे अगोदरच रू.५२४७.03 रक्कमेचा परतावा माहे मार्च २०१९ मध्य देण्यात आला व याबाबतची नोंद एप्रिल २०१९ च्या सीपीएल मध्ये समायोजित केल्याचे दिसते. वीज देयक दुरूस्तीचा कालावधी हा अंदाजे ४ / ५ वर्षापिर्वीचा आहे. ग्राहक गाऱ्हाणे विनियम २००६ / २०20 मधील विनियम ६.६ / ७.८ अन्वय दोन वर्षापेक्षा जास्त कालावधीचा असल्याने कालबाह्य आहे याची नोंद घ्यावी.

- **<u>वीज देयक दुरूस्ती भाग २:</u>** (डिसेंबर २०१८ ते नोव्हेंबर २०१९ - ३ फेज ते १ फेज)

  नोव्हेंबर २०१८ मध्ये मीटर बदली अहवाल भरताना NC पोर्टलवर मीटर क्र.२०१०२१८५ हा मीटर ३ फेज म्हणून live झाला. ज्यामुळे अपिलार्थीला डिसेंबर २०१८ ते नोव्हेंबर २०१९ पर्यंत ३ फेज घरगुती चा स्थिर आकार आकारण्यात आला. डिसेंबर २०१९ मध्ये या अपिलार्थीची ३ फेज घरगुती दराची दुरूस्ती सिंगल फेज घरगुती दरानुसार करण्यात येऊन, डिसेंबर २०१९ पासून सिंगल फेज घरगुती दरानुसार देयक आकारण्यात येत आहेत व अपिलार्थीस ३ फेज प्रमाण जास्त आकारण्यात आलेली रक्कम रू.३३३६.३0 माहे एप्रिल २०२२ च्या वीज देयकातून कमी करून देण्यात आली. अपिलार्थीस वीज जोडणी दिल्यापासून कोणत्याही कालावधीकरीता वाणिज्य दराने देयक आकारण्यात आलेले नाहीत हे सीपीएल मधून स्पष्ट होते. याबाबत ग्राहकास अवगत केले असता, ते समजून घेण्याच्या मनस्थितीत नाहीत.

(Dilip Dumbre)
Secretary
Electricity Ombudsman Mumbai

- **<u>वीज देयक दुरूस्ती भाग ३:</u>** (ऑगष्ट २०१९ ते जून 2020)

  नवीन मीटरची कमतरता असल्या कारणाने ग्राहकास डिसेंबर २०१८ मध्ये ५४१८ प्रारंभी युनीट वापर दर्शवित असलेला मीटर बसविण्यात आला. माहे ऑगष्ट २०१९ मध्ये सदर मीटरदेखील फॉल्टी झाल्या कारणाने ग्राहकास त्या कालावधी पूर्वीच्या ३ महिन्यांच्या वापराच्या सरासरीनूसार ऑगष्ट २०१९ ते जून 2020 या ११ महिन्याच्या कालावधीकरीता फॉल्टी मीटर स्टेटसची प्रती महिना ६७ युनीट वापराची देयके आकारण्यात आली.

  तदनंतर माहे जुलै 2020 मध्ये पून्हा नवीन मीटर बसविण्यात आला. त्यानंतर अपिलार्थीस Normal रिडींगची देयके आकारण्यात आली. या Normal रिडींगनूसार ग्राहकास आकारण्यात आलेल्या युनीटची सरासरी १९१ इतकी असुन अपिलार्थीने जास्तीत जास्त वापरलेले युनीट २५६ इतके आहेत. अपिलार्थीस फॉल्टी स्टेटसने बिलींग होताना केवळ ६७ युनीटची देयके आकारण्यात आलेली होती. मात्र नवीन मीटर नुसार प्रत्यक्षात मीटर रिडींग (सरासरी १९१ युनीट) पाहिले असता अपिलार्थीचा वीज वापर हा ६७ युनीटपेक्षा जास्त असण्याची शक्यता नाकारता येत नाही.

  अपिलार्थीस ऑगष्ट २०१९ ते जून 2020 पर्यंत आकारण्यात आलेली फॉल्टी स्टेटसची देयके ही अपिलार्थीच्या त्या कालावधीपुर्वीच्या ३ महिन्यांच्या वापराच्या सरासरीनूसार आकारण्यात आलेली असल्यामुळे प्रत्यक्षातील वीज वापरापेक्षा कमी युनीट ने आकारलेली आहेत याची नोंद घ्यावी.

- **<u>मंचाच्या आदेशाबाबत :</u>**

  ग्राहकाने दिनांक १६ डिसेंबर २०२१ रोजी मंचाकडे तक्रार दाखल केली. मंचाने दिनांक १८ फेबवारो २०२२ रोजीच्या आदेशान्वये अर्ज मान्य करताना वितरण परवानाधारकास डिसेंबर २०१८ ते नोव्हेंबर २०१९ या कालावधीसाठी अपिलार्थीला ३ फेज घरगुती चा स्थिर आकार आकारण्यात आला व ३ फेज घरगुती दराची दुरूस्ती सिंगल फेज घरगुती दरानुसार करण्याचे आदेश दिले. सदरहू आदेश वीज देयक दुरूस्ती भाग २ नुसार त्या तक्रारीची अंमलबजावणी केली.

- मंचाकडे अपिलार्थीनी दिनांक १६ डिसेंबर २०२१ रोजी तक्रार दाखल केली. ग्राहक गाऱ्हाणे विनियम २००६ / 2020 मधील विनियम ६.६ / ७.८ अन्वये दोन वर्षाच्या कालावधीची तक्रार

(Dilip Dumbre)
Secretary
Electricity Ombudsman Mumbai

करता येते. सबब **दिनांक १६ डिसेंबर २०१९ पुर्वीच्या** तक्रारी ह्या कालबाह्य आहेत. असे असून ही प्रतिवादींनी नियमानूसार अपिलार्थीची वीज देयके दुरूस्त केली आहेत.

- सबब, अपिलार्थीचि वीज देयकाबाबतच अभिवेदन फेटाळण्यात याव.

**विश्लेषण व निर्णय**

५. सुनावणीदरम्यान अपिलार्थीतर्फे अपिलार्थी स्वतः व त्यांचे प्रतिनिधी हजर होत तर प्रतिनिधीतर्फे विजय दिनकर यादव, अतिरीक्त कार्यकारी अभियंता, हे व्हिडीओ कॉन्फरंसमार्फत हजर होते.

६. दोन्ही पक्षकारांचे म्हणणे ऐकण्यात आले व उपलब्ध कागदपत्रांचे अवलोकन करण्यात आले. अपिलार्थी हे महावितरणचे घरगुती ग्राहक आहेत.

अपिलाथींन नमुद केले की, जून २०१७ पासून अपिलार्थी हे त्यांच्या घरात राहत नव्हते. मात्र त्यांनी इतकी वर्ष घरात राहत नसल्याचा कोणताही पुरावा सादर केला नाही. प्रतिवादींनी ऑक्टोबर २०१७ ते नोव्हेबर २०१८ या कालावधीत फॉल्टी स्टेटस प्रमाणे चकीची वीज देयके दिली. प्रतिवादींनी ही वीज देयके नवीन मीटरच्या वीज वापराप्रमाणे १९० युनीट प्रमाणे Bill Revision ID 9938710 द्वारे सुधारीत केली व रू.५२४७.0३ रक्कमेचा परतावा / समायोजन एप्रिल २०१९ च्या सीपीएल मध्ये केल्याचे दिसते. वीज देयक दुरूस्तीचा कालावधी हा अंदाजे ४ / ५ वर्षापुर्वीचा आहे. ग्राहक गाऱ्हाणे विनियम २00६ / २020 मधील विनियम ६.६ / ७.८ अन्वय दोन वर्षापेक्षा जास्त कालावधीचा असल्याने कालबाह्य आहे. तसेच मंचाकडे 'अनुसूची अ' मध्ये याबाबतची मागणी नव्हती, अनुसूची ब' मध्ये प्रथमतः ती करण्यात आली. हे विनियमास धरून नाही.

अपिलार्थीला डिसेंबर २०१८ ते नोव्हेंबर २०१९ या कालावधीत सिंगल फेज घरगुती स्थिर आकाराच्या एवजी ३ फेज घरगुती स्थिर आकाराची वीज देयके देण्यात आलो, हे ग्राहकाच्या सीपीएलवरून दिसते. अपिलार्थीस कुठेही वाणिज्य दराने वीज देयके देण्यात आली नाहीत. असे दिसते की, ग्राहकाने 'घरगुती ३ फेज' जोडणीला 'वाणिज्य' जोडणी समजली आहे जे चुकीचे आहे. मंचाच्या आदेशानुसार अपिलार्थीस ३ फेज प्रमाणे जास्त आकारण्यात आलेली वीज देयके दुरूस्त करून रक्कम रू.३३३६.३0 माहे एप्रिल २०२२ च्या वीज देयकातून कमी करून देण्यात आलेल दिसते. सबब, याबाबतची दुरूस्ती करणे शिल्लक नाही.

(Dilip Dumbre)
Secretary
Electricity Ombudsman Mumbai

अपिलार्थींच्या सीपीएलचे अवलोकन केले असता ऑगष्ट २०१९ ते जून 2020 या कालावधीत फॉल्टी स्टेटसची वीज देयके आकारण्यात आल्याचे दिसते. ग्राहकाने दिनांक १६ डिसेंबर २०२१ रोजी मंचाकडे तक्रार दाखल केली. ग्राहक गाऱ्हाणे विनियम 2020 मधील विनियम ७.८ च्या तरतूदीनुसार फक्त दोन वर्षाचीच म्हणजे डिसेंबर २०१९ नंतरच्या तक्रारोचा विचार करता येतो. नियम खाली नमुद केला आहे.

*"कारवाईचे कारण उद्भवलेल्या दिनांकापासून दोन (२) वर्षाच्या आत तक्रार दाखल केली नसेल तर मंच गाऱ्हाणे स्वीकारणार नाही."*

म्हणून डिसेंबर २०१९ ते जून 2020 या कालावधीतोल फॉल्टी स्टेटसची वीज देयके ही तीन महिन्यात फॉल्टी मीटर बदलला नसल्याने शुन्य युनीट प्रमाणे दुरूस्त करून देण्याची आवश्यकता आहे."

६. सबब, संपर्ण बाबींचा सखोल विचार करता प्रतिवादीना आदेशीत करण्यात येते की, डिसेंबर २०१९ ते जून 2020 या कालावधीतोल शन्य युनीट वीज वापराप्रमाण वीज देयके दुरूस्त करून समायोजित करण्यात यावो. अपिलार्थींच्या इतर मागण्या नामंजूर करण्यात येत आहेत. अपिलार्थींचे अभिवेदन निकाली काढण्यात येत आहे.

७. प्रतिवादीने या आदेशाच्या दिनांकापासून आदेशाची पुर्तता केल्याबाबतचा अनुपालन अहवाल दोन महिन्यात सादर करावा.

सही/-
(वन्दना कृष्णा)
विद्युत लोकपाल (मुंबई)

(Dilip Dumbre)
Secretary
Electricity Ombudsman Mumbai

Electricity Ombudsman Mumbai M.E.R.C.